# छत्रपति श्री शिवाजी महाराज आणि तत्कालिन शासन व्यवस्था

रविंद्र शंकरराव फटींग

प्रस्तावना

भारत हा विविधतेने नटलेला एक देश. भारतावर राज्य करणारे राज्यकर्ते, वंश व त्यांच्या कर्तुत्वाची छाप निश्चितच भारतीय राज्यकारभारात पडलेली दिसून येते. भारतात परकीय आलेत, आक्रमणे झाली, अनेक वंशानी भारतीय क्षेत्रावर राज्ये केलीत. भारतासारखा क्षेत्रफळाने अवाढव्य असणा—या देशात परकीय आक्रमणामुळे येथिल सामान्य व शांततापुर्ण जीवन विस्कळीत होत गेलेत. या परकीय आक्रमणांनी या देशातील धनसंपत्तीचा व कलासंपत्तीचे न भुतो न भविष्यती नुकसान केले. अनेकांनी प्रदेशावर वा प्रांतातर आपली सत्ता स्थापतांना प्रशासनाचे कवच उभारले. प्रशासन व राज्यनीतीचे डावपेच आखणारे चाणक्याचे चाणक्य निती ही याच मातीत रूजविले गेली. आप आपली संस्कृती रूजविली व इतिहासालाही कलाटणी दिली. दक्षिण भारतात इ.स. १३४७ मध्ये हसन गंगू बहमनशहा याने बहमनी साम्राज्याची स्थापना केली. राज्य स्थापन करतांना त्यांना तत्कालिन परिस्थितीत अनेक सरदारंनी सहाय्य् केले. वजीर महमूद गवानच्या मृत्युनंतर बहमनी साम्राज्य अस्तास जायला सुरूवात झाली. बहमनी साम्राज्याची अनेक शक्ले पडलीत. दक्षिणेत अनेकांनी या विघटनातून आपापली साम्राज्ये उभी करण्याचा प्रयत्न केला. या विघटनातून पुढे दक्षिणेत अनेक शाहया उद्यास आल्यात. प्रत्येक सुलतानाने आपले स्वतंत्र राज्य स्थापन केले. या सत्ता संघर्षातूनच अहमदनगरची निजामशाही, विजापूरची आदीलशाही, गोलकुंडाची कुतुबशाही, बीदरची बरीदशाही, बेरारची इमादशाही या पाच शाहया दख्खनेत उभ्या राहील्यात. प्रत्येक शाहीने आपली साम्राज्ये वृद्धिगंत करनेसाठी अनेक मराठा सरदारांना आपल्या दरबारी सरदारी, मनसबदारी, जहागिरी दिल्यात व आपले अश्रित केले. जसा काळ पुढे सरकत गेला तसा प्रशासनातील लोकाचा विश्वास वाढविण्याचा नक्कीचा प्रयत्न केला गेला.

सोळाव्या शतकात मराठा स्वराज्य स्थापतांना शिवाजी महाराजांनी लोकाभिमुख प्रशासन पध्द्तीचा विचार अगत्याने केला. मुघलकालिन प्रशासन पध्दतीतील काही चांगल्या गोष्टी अंगीकारून मनसबदारी पध्दतीतील दोषपूर्ण गोष्टीवर विचारमंथन करूनच शिवकालीन प्रशासन व्यवस्था आखण्यात आली वा स्विकारण्यात आली असावी. शिवाजी महाराजांनी स्वराज्य संकल्पनेला मुहुर्तरूप देताना त्या प्रातांची प्रशासकीय व्यवस्था लावण्याचे धोरण अगत्याने स्विकारले. या सुदुढ प्रशासकीय व्यवस्थेचा प्रत्यय मराठयांना शिवोत्तर काळात आलेला दिसून येतो. त्याला कारण ही महत्वाचेच होते. जर प्रशासकीय व्यवस्था सुदुढपणे लावली नाही तर जिंकलेला प्रांत मोगल वा इतर शाहयांकडे परत जायचा. मराठयांनी जिंकलेल्या प्रातांहून मराठयांचे दुर्लक्ष झाल्या बरोबर तोच प्रांत पराजित शत्रुनी नव्याने जिंकून घेतल्याचे दिसून येते यातूनच पुढे भविष्यात मराठे शाहीच्या अधोंगतीला सुरूवात झाल्याचे दिसून येते. महाराजांची प्रशासन व्यवस्था तत्कालिन मुसलमानी प्रशासन व्यवस्था व भारतीय नीतीशास्त्र या धोरणावर आखलेली होती. निजामशाही वजीर मलिक अबंरच्या महसूल पध्दती धोरणात सुधारणा करून स्वराज्य अंगीकृत फायदेशीर ठरणारी पद्धती स्विकारण्याचा मुत्सदीपणा शिवाजी महाराजांकडे होता. ” इदलशाही निजामशाही, मोगलशाही

एम.ए., नेट, सेट, पेट (इतिहास), बी.एड्. संशोधक विधार्थी आचार्य पदवी, इतिहास
यशवंत महाविद्यालय, वर्धा
**Mobile No. 80552 73031 E-mail : Rfating84@gmail-com**

देश कब्ज केला. त्या देशात मुलकांचे पाटिल, कुलकर्णी यांचे हाती कुळ रयत यांनी कमविसी करावी आणि मोघम टक्का दयावा. हजार दोन हजार जे गावी मिरासदारांनी घ्यावे ते गावी दोनशे तिनशे खंडमक्ता दयावा. त्यामुळे मिरासदार पैकवारी होऊन गावास हुडे,वाडे,कोट बांधून प्यादे बंदुकी देउन बळावले.“ असे समासदकार वर्णित करतात. ”सामान्य लोकांना कोणत्याही जहागिरी न देता स्वतंत्रपणे पगारी नौकरी दिली.“ शिवाजी महाराजांनी ग्राम रचनेत फारसा बदल न करता पिढीजात वतनदार असणारे देशमुख, देशपांडे यांच्या अधिकारावर मर्यादा आणल्यात.

राज्यव्यवस्थेचे दोन अंगे आहेत. १. प्रशासन व्यवस्था २. लष्करी व्यवस्था

१ प्रशासन व्यवस्थारू—

शिवाजी महाराजांनी राज्यव्यवस्था चालवितांना त्यांच्या अधिपत्याखाली प्रदेशात मुलकी व्यवस्थेत सुधारणा घडवून आणाल्यात. व्यवस्थेला लष्करी व मुलकी स्वरूप दिले. लष्करी व्यवस्थेत किल्ले, पायदळ, पागा, आरमार असे स्वतंत्र उपविभाग होते. किल्यामुळे आजूबाजूच्या प्रदेश, प्रातांवर लक्ष ठेवणे, त्याचा बंदोबस्त करणे शक्य होत असे. मुलकी व्यवस्थेतील मुल्क हा अरबी शब्द असून त्याचा अर्थ बिनलष्करी असा आहे. स्वराज्यातील प्रदेशाची पिकपाणी करवसुली म्हणजेच मुलकी व्यवस्था. इ.स. १६७३ मध्ये पन्हाळा किल्ला हस्तगत केल्यानंतर शिवाजी महाराजांनी आपल्या स्वराज्याचे तीन भाग केले, सरसुमेदाराची नेमणुक करण्यात आली.

१. उत्तर विभाग — देशावरचा साल्हेर ते पुणे पर्यतचा भाग व कोकण—मोरोपंत पेशवे
२. दक्षिण विभाग — दक्षिण कोकण, सावंतवाडी, कारवारचा उत्तर विभाग, अण्णाजी दत्तो —सुरनवीसध्सचिव
३. दक्षिण पूर्व विभाग — सातारा, कोल्हापूर, कर्नाटकचा काही भाग, कोपल्ल, तुंगभद्रा दत्तोजी पंत— वाकनीस

स्वराज्यातील महसूल विभाग व अधिकारी

१. सरसुभा — अनेक सुभे व्यापणारी प्रदेश — करसुभेदार
२. सुभाप्रांत — अनेक परगणे व्यापणारा प्रदेश — सुभेदार
३. परगणा — अनेक तर्फा व्यापणारी प्रदेश — हवालदार / कमाविसदार
४. मौजे, तर्फे, कर्त्यात गावे,खेडी— देशमुख किंवा देसाई, देशपांडे किंवा कुळकर्णी, पाटिल

प्रांत किंवा सुभा यांचे काम पाहणारा सुभेदार यांच्या हाताखाली आठ अधिकारी असत.

१. दिवाण २. मुजूमदार ३. फडणीस ४. सबनीस ५. कारखानीस ६. चिटणीस ७. जामदास ८. पोतनीस

शिवकालीन लष्करी व्यवस्थेत कोणत्याही सरदारला, सैनिकाला जहागिरी अथवा इनामी गावे दिली जात नसे. सर्वाच्या दर्जानूसार रोख पगार दिला असे. सर्वच पदावरील लोकांनी आपले कार्य व कर्तव्य कटाक्षाने पार पाडावेत याकडे विशष लक्ष दिले जात असे.

शिवाजी महाराजांचे मंत्रीमंडळ किंवा अष्टप्रधान मंडळ —

”प्रशासकीय व्यवस्थेत राजा हा केंद्र सत्तेचा प्रमुख म्हणून केंद्रस्थानी निर्माण केला. “ रामचंद्रपंत अमात्य आज्ञापत्रात नमूद करतात की, ” विविध प्रकारची राज्याची कार्ये केवळ राजानेच करने शक्य नाही तेव्हा राज्यकारभार चालविण्यासाठी प्रधान नेमावेत. आपल्या सत्तेप्रमाणेच त्यांचीही सर्वावर सत्ता सर्वावर चालावी.“ या धोरणाना अनुसरूनच शिवाजी महाराजांनी अष्टप्रधान मंडळाची निर्मिती केली. शिवाजी राजांचा आपल्या मंर्त्यावर पूर्ण विष्वास होता. मुख्य प्रधान किंवा पेशवा हे मानाचे व अनेक अधिकार असणारे पद निर्माण करण्यात आले. ”शिवकालीन राज्यकारभारात राजा किंवा छत्रपती सत्तेच्या केंद्रस्थानी होते व त्यावर अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार छत्रपतीलाच असे.राज्ययंत्रणेचा मुख्य आधार राजा असे.“

प्रशासकीय व्यवस्थेत अधिकारांची वर्गवारी.

राजाध्छत्रपती—

अष्टप्रधानमंडळ (पेशवा, अमात्य, सचिव, सेनापती, वाकनीस, सुमंत, पंडितराव, न्यायधिश)—

कारकुनध्कचेरी—

(दिवाणमुजूमदार लेखापरिक्षक, फडणीस, सबंनीस, चिटनीस, कारखानीस, जामदार, पोतनीस)

”राज्यरोहन संभारभाच्या शुभमुहुर्तावर अष्टप्रधान राजाच्या मस्तकावर गंगाजलाने अभिषेक करण्यासाठी, सुर्वणाचे आणि चांदीचे कलश आणि तख्त घेउन सिहासनाच्या दुर्तफा उभे होते. “राज्याभिषेक सोहळयाच्या प्रथम वर्षी अष्टप्रधान व इतर विभागाच्या प्रमुखाचे कार्ये पार पाळतानची कर्तव्य वा कामकाजाचे विश्लेषणध्निवेदन करणारे ‘कानु जाबता’ हे सरकारी कागदपत्र तयार करण्यात आले. रावबहादुर काशिनाथ नारायण साने यांनी प्रसिध्द केलेल्या कानु जाबता यात अष्टप्रधानाची कार्ये यांचे विश्लेषण आढळते.” राज्याभिषेक सोहळयाच्या प्रसंगी खालील नमूद पदाधिकारी अष्टप्रधानाची कर्तव्य वा जवाबदारी पार पाडताना दिसतात.“

१. पेशवा किंवा मुख्यप्रधान (मोरोपंत त्रिंबक)रू मुख्यप्रधानांनी सर्व राज्यकारभार करावा. छत्रपतींकडून मुद्रा होऊन आलेल्या पत्रांवर प्रधानाने मुद्रा करावी. सेना घेऊन युध्द प्रसंगी स्वारी करावी. नेमून दिलेल्या प्रदेशाचा कारभार करावा. शत्रूची बातमी काढून त्याचा बंदोबंस्त करावा.

२. अमात्य (नारो निळकंठ निळकंठ व रामचंद्र)रू यांनी सर्व राज्यांतील उत्पन्नाचा व खर्चाचा जमाखर्च पहावा. हे काम दप्तरदार व फडणीस यांजकडून करून घ्यावे. चिटणीशी पत्रावर निशानी करावी. प्रसंगी लष्कराचे अधिपत्य करून युध्दे करावी. छत्रपती जो प्रदेश नेमून देतील त्याचा कारभार दक्षतेने करावा.

३. सेनापती (हंबीरराव मोहिते)रू सर्व सेनेचे रक्षण करावे. सैनिकांचे वेतन वेळच्यावेळी दयावे. सेनेत जे पराक्रम गाजवतील त्यांचा गौरव छत्रपतींची मंजुरी घेऊन छत्रपतींच्या हस्ते करावा. त्यांना छत्रपतींकरवी मान—सन्मान व बक्षिसे घावीत. सेनेचे अधिपत्य करून युध्दादिप्रसंग करावे.

४. सचिव (अण्णाजीपंत सुरणीस)रू यांनी छत्रपतींचा सर्व पत्रव्यवहार स्वत: पहावा, महाल परगणे यांच्या हिशेबाची तपासणी करावी. युध्दादिप्रसंग करून जिंकलेल्या मुलुखाचा कारभार पहावा. राजपत्रावर संमत असे चिन्ह करावे.

५. मंत्री (दत्ताजी त्रिंबक वाकनीस)रू याने राज्याच्या राजकीय व राजनैतिक बाबी सांभाळाव्या. परदरबारांतून आलेल्या पाहुण्याचे अगत स्वागत करावे. छत्रपतींची दिनंचर्या लिहावी. त्यांनी केलेल्या कार्याची नोंद ठेवावी. राजपत्रावर संमत असे चिन्ह करावे.

६. पंडितराव (रघुनाथराव)रू यांनी सर्व धार्मिक बाबींवर अधिकार चालविणे. पंडित, विद्वान, ब्राम्हण यांचे सन्मान करावे. अपराध्यास शिक्षा करावी. समाजातील परंपरा, आचार—विचार, प्रायश्चित संबंधीच्या पत्रावर सहया कराव्या व संमत असे चिन्ह करावे.

७. न्यायधीश (निराजी रावजी)रू राज्यांतील सर्व प्रकारच्या खटल्यांवर अधिकार चालवावा, खटल्यांत धर्म—अधर्म पाहून अपराध्यास शिक्षा करावी. न्यायाच्या निवाडपत्रांवर संमत चिन्ह करावे. छत्रपतींच्या चारित्रयास दोष न लागेल असे निष्पक्षपातीपणे कार्य करावे.

८. सुमंत (त्रिंबकजी सोनदेव डबीर यांचे पुत्र रामचंद्रपंत)रू यानी परराष्ट्र व्यवहार पहावा. पराराज्यातील राजकारणावर लक्ष केद्रींत करावे. राजपत्रावर संमत चिन्ह करावे.

अष्टप्रधानाची कर्तव्य वा जवाबदारी पार पाडताना काही कसूर केल्यास वा जवाबदारी योग्य पध्दतीने पार न पाडल्यास पदावरून दुर केल्याचे दिसून येते. कोणतेही पद देतांना वंशाचा विचार न करता फक्त योग्यतेचा विचार

केला जात असे.

अष्टप्रधानाच्या हाताखाली अठरा कारखान्यांवर अधिकारी व बारा महाल असते.

१८ कारखाने:

१. खजिना २.जवाहिरखाना ३.अंबरखाना (हत्तीचे सामान) ४.शरबतखाना (औषधे) ५.तोफखाना ६. दफतरखाना ७. जामदारखाना (सर्वप्रकारची नाणी इ) ८. जिरातखाना (शेती) ९.मुतबखखाना १०.उश्टरखाना (उंट व त्यांचे सामान) ११. नगारखाना १२. तालीमखाना १३. पीलखाना १४. फरासखाना १५. दारूखाना १६.शरतखाना

१२ महाल:

१.पोते (खजिना) २. सौदागिर (माल) ३. पालखी ४. कोठी ५. इमारत ६. बहिली (रथ) ७. पागा ८. शेरी ९. दरूनी (अन्तपूर) १०. थट्टी (गोळा) ११. टांकसाळ १२. छबिना

"कारखाने व महाल सरकारच्या म्हणजेच शिवाजी महाराजाच्या मालकीचे होते. सर्वाचा हिशोब दफ्तरात ठेवला जात असे. शिवाजी महाराजांनी आपल्या सोयीसाठी स्वराज्याचे २९ महसूल विभाग पाडले. " पुणे परगणा हा फार मोठा होता.

स्वराज्याचे २९ विभाग दृ

१.पुणे व वाई २.मावळ ३.सातारा ४.कराड ५. खराव ६.माणदेश ७.मलकापूर ८.तारळे ९.पन्हाळा १०.आजरा ११.जुन्नर १२.कोल्हापूर १३.रामनगर १४. भीमगड १५.भिवंडी १६.कल्याण १७.महाड १८. जावडी १९.राजापूर २०.कोळे २१.कुडाळ २२.वेळगाव २३.लक्ष्मीनगर २४.गदम २५.कोप्पल २६.हल्हयाळ २७. संपगाव २८.भुजगगड २९.नवलगड

शिवाजी महाराजांकडे वडिलोपार्जित जहागिरीशिवाय १४ प्रांत होते.

१.मावळ प्रांत — सभोवतालचे १८ डोंगरी किल्ले २.वाई, सातारा आणि कऱ्हाड हे प्रांत — सभोवतालचे किल्ले ३.पन्हाळा प्रांत व १३ डोंगरी किल्ले ४.दक्षिण कोकण प्रांत व ५८ डोंगरी किल्ले व जलदुर्ग ५.ठाणेप्रांत व १२ किल्ले ६.त्रिंबक ७.बागलाण प्रांत व ६२ डोंगरी किल्ले ८.वनगडपांत व १८ किल्ले ९.बिदनुर १०. कोल्हार ११.श्रीरंगपट्टण व १८ किल्ले १२.कर्नाटक प्रांत व १८ किल्ले १३.बेरार प्रांत व २५ किल्ले १४.तंजावर प्रांत व ६ किल्ले.

"डोंगरी किल्ला व त्याच्या पायथ्याचा प्रदेश हा राज्याचा १ तुकडा मानने हे शिवाजी महाराजाच्या राज्यपध्दतीचे तत्व होते. "

महसुल सुधारणारू—

शिवकालीन महसुल व्यवस्थेत जमीन महसुल हाच उत्पत्नाचा मुख्य घटक होता. महसुल वसुल करण्याचे दुष्टीने यांचे स्वराज्य व मोगलाई असे दोन विभाग होते. स्वराज्य याचा अर्थ महाराजांच्या ताब्यात असलेला प्रदेश व मोगलाई म्हणजे परकियांच्या ताब्यात असलेला परंतु शिवाजी महाराजाना खंडणी देणारा प्रदेश. शिवाजी महाराजाची महसूले पध्दती मलिक अंबरच्या तत्वानुसार दादोजी कोडदेवांनी आखलेली होती. जमीनीची मोजणी करून महसुलात वाढ करण्याच्या दुष्टीकोनातून दादोजी कोडदेव यानी जमिनदारी पध्द्तीत अधिकाधिक सुधारण घडवून आणल्यात व मोरोपंत पिंगळे यांनी रयतवारी पद्धत लोकाभिमुख करण्याचा प्रयत्न केला. अण्णाजी दत्तो यांनी केलेल्या सुधारणेप्रमाणे महसुल व्यवस्थेत अनेक बदल करण्यात आले. मंत्रीमंडळतील एक सरकारकुन प्रत्येक विभागावर प्रमुख म्हणून नेमण्यात आला. सभासदाने नमूद केल्यानुसार त्या विभागाची संपूर्ण जवाबदारी त्याच्यावर सोपविण्यात आली होती.

जमीनीच्या वर्गवारीचे प्रकार—

शिवाजी महाराजानी जमिनीची वर्गवारी करताना अनेक बाबी तपासून, जमीनीची पाहणी करून शेतसारा लावला जात असे. जमीनीची मोजणी करण्यासाठी शिवशाही काठी वापरली जात असे. याबाबत सभासद बखरीत म्हटले आहे. " पांच हात पांच मुठीची काठी, हात चवदा तसूच असावा हात व तसु मिळून वैंशी तसूची लांबी काठीची वीस काठया औरस चौरस त्याचा बिघा एक बिघे एकशे वीस यांचा एक चावर. अशी जमिन मोजून गावची गाव चौकशी केली.' " शिवशाही काठीची लांबी काही

ठिकाणी ८२ तसूच्या ऐवजी ८४ तसू असल्याचे दिसून येते.जमिनीच्या मोजणीचे पध्दतीला 'बिघावणी,चावराणा किंवा चकबंदी म्हणत असे. प्रत्येक गावच्या हद्दी ठरण्यात शेषतक—यांच्या जमिनीचे क्षेत्रफळ निश्चित केले. शेतक—यांने एकंदर उत्पत्नाचे तीन हिस्से स्वत:कडे ठेवून दोन हिस्से सरकारात दयावे या बाबीला विशष महत्व दिले जात असे. "नविन येणा—या रयतेस गुरेढोरे, बी—बीयाने यासाठी पैसे दयावेत आणि नंतरच्या वर्षानी त्याच्या ऐपतीप्रमाणे वसूल करून घेतले जात असत." "ऋतूमानानुसार दराचे प्रमाण ठरत असे. जेव्हा एखादया खेडयाची जामबंदी केली जाई तेव्हा तेथील माळ जमीन त्यातून वगळण्यात येई." शिवकाळात जमीन महसुलाची आकारणी ही एकाच नियमान्वये केली जात नसे. सारा आकारणी जमीनीची प्रत, पाणी, हवामान, पिक यावर अवलबुंन होती. पिकान्वये कर आकारला जात असे. शेतसारा धान्य वा रोख घेतला जाई. एखदा सारा निष्चित झाल्यानंतर वाद उत्पन्न होईपर्यत एक सारखाच सारा आकारला जाई.

डा. अ.रा. कुलकर्णी यांनी कररचनेचे ३ प्रकार केलेले आहेत. त्यात खालील बाबी अंतर्भुत आहेत.

१. प्रत्यक्ष कर — इनापट्टी, मिरासपट्टी, देशमुखपट्टी, सरदेशमुखीपट्टी, पायपोसी, तेलपट्टी, कारागिरावरील कर, मोहतर्फा, हेजिबपट्टी, वेठबिगारी, सिहासनपट्टी इ.

२. अप्रत्यक्ष कर — जकात

३. संकिर्ण किवा इतर कर — सादिलवार पट्टी, खर्चपट्टी, वराडटका किंवा लग्नटका, घरटका, तुटपट्टी व नुकसानपट्टी याशिवाय उल्फापट्टी जंगमपट्टी, दसरापट्टी, तोरणभेटी, मेजवानीपट्टी, ठाणेपट्टी इ. कर आकारण्याच्या पदृधती होत्या.

४. चाौथाई व सरदेशमुखीरू— यातूनही खंडणी स्वरूपात कर प्राप्त होत असे.

शिवाजी महाराजांच्या महसूल व्यवस्थेची वैशिष्टयेरू—

१. शिवाजी महाराजांनी लष्करी सत्तेला मुख्यस्थानी न ठेवता मुलकी सत्तेच्या ताब्यात लष्करी सत्ता ठेवली. आठ प्रधानांसाठी एकच प्रधान सेनापत्ती ठेवला. सहा प्रधानाना मुलकी कारभारात मुख्य कर्तव्यात ठेवून लष्करी जवाबदारी सोपवली जात असे.मुलकी प्रशासनाला राज्यव्यसस्थेत महत्वाच्या स्थान दिल्याने व लष्करी प्रशासन असे विभाजन केल्याने वतनदारीचा कणाच मोडला गेला.

२. सभासदाने नमूद केल्याप्रमाणे शिवकाळात जमिनीची मोजणी करून तिचा शेतसारा कायमचा ठरवून दिला जाई व गोळा करण्याकरिता सरकारी अधिकारी नेमले गेले.

उत्तर विभाग — मोरोपंतपिंगळे — मुख्य प्रधान

दक्षिण विभाग व तळकोकण — अण्णजी दत्तो सचिव

देश किंवा नैॠत्य भाग — दत्ताजीपंत वाकनिस

३. सारा ठरविताना २५/पेक्षा जास्त सारा केव्हा ही कोणत्याही स्वरूपात घेतला जाउ नये अशा महाराजाचा दंडक होता. जमिनीचे मोजमाप करून ती खातेदाराच्या नावावर करून व सरकारी सा—याबद्दल कबुली लिहुन घेउन शेतक—याच्या स्वाधीन करने.

४. पुर्वापार चालत आलेल्या जमिनदारी पध्दत विर्सजित करून रयतवारी पध्द्त अमलात आणून वतनदार देशमुख, देशकुळकणी, पाटील यांचे वर्चस्व नष्ट केले. राज्यात सार्वभौम सत्ता व शिस्त निर्माण केली.

५. शिवाजी महाराजानी आपात्कालीन परिस्थिती शेतक—यांना जनावरे अवजारे धान्य घेण्यासाठी सरकार कडुन रोख रक्कत काही कालावधीसाठी दिली जात असे. तगाई ने दिलेली रक्कम हफ्तेवारीने परत देण्याचे निश्चित करण्यात येत असे.

६. दुष्काळ, महापूर, वादळ, रोगराई, यासारख्या नैसर्गिक आपत्तीनी किंवा इतर आपत्तीनीही

शत्रुपक्षाने आक्रमण केल्याने झालेल्या नुकसानाचे प्रत्यक्ष अंदाज घेऊन रयतेला सारा भरण्यात सुट दिली जात असे.

७. शिवाजी महाराजांनी वतनदारी पध्दतीबाबत घेतलेला महत्वाचा निर्णय म्हणजे देशपांडे देशमुख या पिढीजात वतनदाराकडे असलेले वसुलीचे अधिकार काढुन घेऊन सरकारने नेमलेल्या अधिका—यांकडे सोपविण्यात येत असे. महाराजांच्या धोरणामुळे वतनदार प्रबळ होऊन सरकारविरूद्ध बंड करण्याची भिती नष्ट झाली. शिवाजी महाराजाची वतनदाराबाबतची भुमिका आज्ञापत्रात नमूद करताना रामचंद्रपंत अमात्य लिहीतात, " प्रचलित वतने चालू ठेवावीत परंतु वतनदारांचा रयतेवरील हक्क काढून घ्यावा. "

८. नेमलेल्या अधिका—यांच्या एका सुभ्यातून दुस—या सुभ्यात एका प्रातांतून दुस—या प्रातांत बदल्या होत असे.

९. हिंदु—मुस्लिम देवालये, मशिदि मठ, धर्मशाळा यांना खर्चासाठी काही वतने दिली गेली. साधुसंत, वैद्य यांना सनदा दिल्या गेल्या.

१०. अनेक प्रकारच्या करातून महसुली उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न केला गेला.

११. जमीन महसूलाची आकारणी करताना जमीनीची प्रतवारी पिक व पिकांचे प्रकार, यावरून तसेच पिकांची लागोपाठ तीन वर्ष पाहणी करून त्या माहितीच्या आधारे हि कर निश्‍चित केला जाई.

१२. शिवकाळात राजा हा केंद्रस्थानी असून शिवाजी महाराजाना अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार होते. शिवाजी महाराजांच्या आदेशाशिवाय वा हुकुमाशिवाय कोणत्याही निर्णयाला अंतिमता प्राप्त होत नसे. महाराजाच्या अधिकार कक्षेत अष्टप्रधान मंडळ, १२ महाल, १८ कारखाने याचा समावेश होता. शहाजी महाराजांकडुन मिळालेला ४०,००० होन उत्पन्नाच्या पुणे महालापासून ते राज्याभिषेकाच्या वेळेपर्यंत शिवाजी महाराजांचे उत्पन्न एक कोटी होत झाले होते असे दिसून येते.

लोक कल्याणकारी राज्य कसे असावे हे शिवमुद्रेतून प्रकर्शाने दिसून येते.

प्रतिपच्चंद्रलेखेव वर्धिष्णुविष्ववंदिता ।। शाहसुनो: शिवस्यैशा मुद्रा भद्राय राजते ।।

(प्रतिपदेचा चंद्र जसा कलेकलेने वाढत जातो आणि सा—या विश्‍वात वंदनीय होतो. तशाच शहाजीचा पुत्र शिवाजी महाराजांच्या मुद्रेचा लौकिक वाढत जाईल.)

निष्कषर्र्—

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापताना राज्यकारभारात प्रशासन व्यवस्थेला अधिक महत्व दिल्याचे दिसून येते. लष्करी व्यवस्थेवर मुलकी व्यवस्थेचे काटेकोरपणे लक्ष दिल्याचे दिसून येते. राज्यकारभारात सारा किंवा कर लावताना प्रदेशाच्या बारीकसारीक गोष्टीची माहिती घेउन योग्य तो कर लावल्याचे दिसते. वतनदारी पद्धत, महालवारी पद्धतीतील दोषपूर्ण व्यवस्था दुर करून रयतवारी पद्धतीला प्राधान्य दिल्याचे दिसून येते. सारा ठरविताना एकुण उत्पन्नाच्या २७५ पेक्षा जास्त सारा घेतला जाउ नये अशी महाराजाची शिस्त होती. अष्टप्रधान मंडळ त्यांच्या कार्यक्षेत्रातील अधिकारी यांनी स्विकारायचे धोरण कार्य पद्धती ठरवून दिलेल्या दिसून येतात. ''आहे वतन इतकियावर कालक्रमणा करावी. सर्व देशाचा स्वामी म्हणजे राजा त्याच्याशी निष्ठेने वर्तावे. " यातून अंतिम सत्ता राजाच्याच हाती हे लक्षात येते. मनसबदारी पदधतीतील दोषपुर्ण व्यवस्था लक्षात घेऊन स्वराज्य स्थापल्याने स्वराज्य छत्रपती राजारामापर्यत एकसंघ असल्याचे दिसून येते.

तळटिपा

जोशी शं.ना. (संपादक), क्रिष्णाजी अनंत सभासद विरचित आद्‌य छत्रपती श्री.शिवाजीराजे भोसले यांची बखर, वरदा प्रकाशन,पुणे, दुसरी आवुत्ती जानेवारी २०१९

Sarkar Jadhunath] Shivaji & His Times]

Lonhmans Green & Co-]Londan] 2nd Edition]1920-

जोशी शं.ना., उपरोक्त

Sarkar Jadhunath ,उपरोक्त

बनहटटी श्री. न. (संपादक), रामचंद्र पंडीत अमात्य कृत आज्ञापत्र, सुविचार प्रकाषन मंडळ, ,पुणे, दुसरी आवृत्ती, १९६५

Sen Surendranath] Administrative System of Maratha] University of Culcutta]2nd Edition 1925-

हेरवडकर आर वी. (संपादक), मल्हार रामराव चिटणीस विरचित छत्रपती शिवाजी महाराज याचे सप्तप्रकरणात्मक चरित्र, व्हिनस प्रकाषन पुणे,दुसरी आवृत्ती, २०००.

जोशी शं.ना., उपरोक्त

जोशी शं.ना., उपरोक्त

सोहनी कृ. वि. (संपादक), पेशव्याची बखर, प्रकाशक का. ना. राणे पाचवी आवृत्ती, १९२५

Sarkar Jadhunath, उपरोक्त

हेरवडकर आर वी., उपरोक्त

Sen Surendranath, उपरोक्त

Sen Surendranath, उपरोक्त

जोशी शं.ना., उपरोक्त

जोशी शं.ना., उपरोक्त

राजवाडे वि.का (संपादक), वि.गो.विजापुरकर, मराठयांच्या इतिहासाची साधने, प्रथम आवुत्ती,१९१२

सरदेसाई बी.एन.,मराठयांचा सामाजिक आर्थिक सांस्कृतिक व इतिहास, फडके प्रकाशन, २००१

सरदेसाई गो.स. (संपादक), मराठी रियासत खंड १, (शहाजीराजे भोसले शककर्ता शहाजी ), प्रकाशक पाप्युलर प्रकाशन प्रा. लि. मुंबई, पुनर्मुद्रण दुसरी आवृत्ती, ,१९८८

जोशी शं.ना., उपरोक्त

जोशी शं.ना., उपरोक्त

Ranade M-G-] Rise of Maratha Power ] Punalekar & Company Mumbai] 1900-

जोशी शं.ना., उपरोक्त

सरदेसाई गो.स., उपरोक्त

सरदेसाई गो.स., उपरोक्त

सरदेसाई गो.स., उपरोक्त

बनहटटी श्री. न

राजवाडे वि.का (संपादक), वि.गो.विजापुरकर., उपरोक्त

राजवाडे वि.का (संपादक), वि.गो.विजापुरकर., उपरोक्त

जोशी शं.ना., उपरोक्त

जोशी शं.ना., उपरोक्त

संदर्भ ग्रंथ सूची

१. आपटे द. वि., दिवेकर स.म. (संपादक), शिवचरित्र प्रदीप, भारतीय इतिहास संशोधन मंडळ प्रकाशन ,पुणे, पुनर्मुद्रण आवृत्ती, २००९.

२. कुळकर्णी अ. रा.,शिवकालीन महाराष्ट, राजहंस प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती, १९९७.

३. जोशी शं.ना. (संपादक), क्रिष्णाजी अनंत सभासद विरचित आद्‌य छत्रपती श्री. शिवाजीराजे भोसले यांची बखर, वरदा प्रकाशन,पुणे, दुसरी आवुत्ती जानेवारी २०१९.

४. पगडी सेतु माधवराव, छत्रपती शिवाजी, नॅशनल बुक ट्रस्ट, सातवी आवृत्ती ,२००९

५. बनहटटी श्री. न. (संपादक), रामचंद्र पंडीत अमात्य कृत आज्ञापत्र, सुविचार प्रकाषन मंडळ, ,पुणे, दुसरी आवृत्ती, १९६५

६. वाकसकर वि. स.(संपादक), दत्ताजी त्रिमल वाकेनिविस कृत शिवछत्रपतीची ९१ कलमी बखर, श्री लक्ष्मी नारायण प्रेस, मुंबई, १९३०.

७. दिवेकर स.म. (संपादक), कविंद्र परमानंदकृत श्री शिवभारत, मर्वेन टेक्नालाजीज प्रकाशन, तृतीय आवुत्ती, सप्टेंबर २०१८.

८. राजवाडे वि.का.(संपादक), जयराम पिडये विरचित राधामाधवविलासचंपु, चित्रशाळा

छापखाना, पुणे शके १८४४.

९. राजवाडे वि.का (संपादक), वि.गो.विजापुरकर, मराठयांच्या इतिहासाची साधने, प्रथम आवुत्ती,१९१२

१०. सरदेसाई बी.एन.,मराठयांचा सामाजिक आर्थिक सांस्कृतिक व इतिहास, फडके प्रकाशन, २००१

११. सरदेसाई गो.स. (संपादक), मराठी रियासत खंड १, (शहाजीराजे भोसले शककर्ता शहाजी ), प्रकाशक पाप्युलर प्रकाशन प्रा. लि. मुंबई, पुनर्मुद्रण दुसरी आवृत्ती, ,१९८८

१२. सोहनी कृ. वि. (संपादक), पेशव्याची बखर, प्रकाशक का. ना. राणे पाचवी आवृत्ती, १९२५.

१३. हेरवडकर आर वी. (संपादक), मल्हार रामराव चिटणीस विरचित छत्रपती शिवाजी महाराज याचे सप्तप्रकरणात्मक चरित्र, व्हिनस प्रकाषन पुणे,दुसरी आवृत्ती, २०००.

१४. Ranade M-G-] Rise of Maratha Power ] Punalekar & Company Mumbai, १९००.

१५. Sarkar Jadhunath] Shivaji & His Times] Lonhmans Green & Co-]Londan] 2nd Edition,१९२०.

१६. Sen Surendranath] Administrative System of Maratha] UNIVERSITY OF CALCUTTA]2nd Edition १९२५.